# प्रेसनोट दि. ०१/०४/२०१९

**दि. २४/०३/२०१९ ते ३०/०३/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये ४,५८,९५०/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.**

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्वारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते. अशाच एका प्रकारात अर्जदार नामे प्रकाश भातेजा हे ॲमोझॉन वर खरेदी करीत असताना त्यांना आज पाच हजारापर्यंत खरेदी केल्यास बक्षीस लागेल असे सांगुन त्याच्या कडुन पैसे घेवुन त्याची रुपये १०,०००/- आर्थिक फसवणुक केली होती सदरबाबत पेटीएम या मर्चटशी तात्काळ पत्रव्यवहार करुन त्याची संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. दुसऱ्या एका प्रकारात अर्जदार नामे संगिता डोळे हया मेक माय ट्रिप द्वारे बुकीग करीत असताना त्याची फसवणुक करण्यात आली सदरबाबत तात्काळ मेक माय ट्रिपशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली सर्व रक्कम रुपये ५,०००/- रिफंड करण्यात आली.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर क्राईम पोलीस स्टेशन मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्वारे सदर बँकला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्वारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे एका अर्जात अर्जदार बेलिदा भाटीया यांच्या क्रेडीट कार्डवर परदेशात अनधिकृत व्यवहार होवुन त्याची ७५,०००/- रुपयाची आर्थिक फसवणुक केली होती. सदर बाबत तात्काळ एचडीएफसी बँकेशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे विनोद नाईक यांचे डेबीट कार्ड त्याचे जवळ असताना तसेच त्यानी कोणतीही माहिती शेअर न करता त्याच्या खात्यामधुन अज्ञात इसमाने रोख रुपये ४,०००/- काढले होते सदर बाबत तात्काळ स्टेट बँकेशी पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच सतिश शेजवळ याच्या खात्यावरुन परदेशात अनधिकृत व्यवहार होवुन त्याची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन सिटी बँकेकडुन १,२१,६४०/- व कोटक महिद्र बँकेकडुन १२,९५९/- रुपये अर्जदार यांना रिफंड करण्यात आले. तसेच अर्जदार नामे दर्शना वागळे हिचे डेबीट कार्ड तिचे जवळ असताना अनधिकृत व्यवहार होवुन तिची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ ॲक्सीस बँकेशी पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेले संपुर्ण रक्कम रुपये ८०,१५२/- रिफंड करण्यात आली. अशाच प्रकारच्या दुस-या अर्जात अर्जदार नामे सौ सारंगा पोफळे यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या डेबीट कार्डवर ऑनलाईन ट्रॅन्झॅक्शन होवुन त्याची ५२,३९९/- रुपयांची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ आयसीआयसीआय बँकेशी पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार प्रतिक बाबर यांचे एचडीएफसी एटीएम कार्ड अर्जदार यांचेजवळ असताना कोणा अज्ञात इसमाने त्याच्या अकाउंटमधून २१,९००/- रुपये काढुन आर्थिक फसवणुक केली होती सदरबाबत एचडीएफसी बँकेस पत्रव्यवहार करुन त्याची संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. अशाच प्रकारच्या दुस-या अर्जात अर्जदार अंकित जैन याच्या डेबीट कार्डवर अज्ञात इसमाने अनधिकृत ट्रॅन्सॅक्शन करुन त्यांची १४,०००/- रुपयाची आर्थिक फसवणुक केली होती सदरबाबत एचडीएफसी बँकेस पत्रव्यवहार करुन त्याची

संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. डेबीट कार्ड अर्जदार यांचे जवळ असताना अनधिकृत व्यवहार होवुन अर्जदार ए. नारायण यांची ९,०००/- रुपयाची फसवणुक झाली होती त्याबाबत बँक ऑफ इंडियाशी पत्रव्यवहार करुन त्याची सर्व रक्कम रिफंड करण्यात आली. अशाच प्रकारच्या अर्जात अर्जदार राहुल कुलकर्णी यांची १४,५००/- रुपयाची फसवणुक झाली होती त्याबाबत बँक ऑफ इंडियाशी पत्रव्यवहार करुन त्याची सर्व रक्कम रिफंड करण्यात आली तर अर्जदार अद्वैत गोखले यांची १२,०००/- रुपयाची फसवणुक झाली होती त्याबाबत बँक ऑफ इंडियाशी पत्रव्यवहार करुन त्याची सर्व रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे रामकृष्णा अनथा यांचे एचडीएफसी डेबीट कार्ड अर्जदार यांचेजवळ असताना अज्ञात इसमाने अनधिकृत व्यवहार करुन त्याची २६,४००/- रुपये काढुन आर्थिक फसवणुक केली होती सदरबाबत एचडीएफसी बँकेस पत्रव्यवहार करुन त्याची संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.